# प्रेस नोट

दिनांक 21/08/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अवैधरित्या गौण खनिज (मुरूम)ची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## .....स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई.....

दि. 20/08/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे अरोली हद्दीत गस्त घालीत असता निमखेडा शिवारात एक इसम मुरूम गौण खनिजची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरुन खबरेची शहानिशा करण्यासाठी स्था.गु.शा. चे पथक तेथे गेले असता दि. 20/08/2020 चे 23.39 वा. सुमारास एमएच– 40/बीजी– 9449 क्रमांकाचा 10 चक्का टिप्परचा चालक आरोपी नामे– अफजल महबुब शेख, वय 37 वर्ष, रा. नागपुर याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास गौण खनिज (मुरूम) वाहतुक करतांना मिळून आला. आरोपीच्या ताब्यातुन मुरूम, 1 सॅमसंग मोबाईल व वाहनासह असा एकुण कि. 30,13,500/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक दिनेश अधापुरे स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. सहकलम 184, 130/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक उमेश इंगळे हे करीत आहे.

सदर कार्यवाही श्री. राकेश ओला, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण तसेच श्रीमती मोनिका राऊत, अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोना दिनेश अधापुरे, पोशि अमोल वाघ, विपीन गायधने सर्व नेमणूक स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांनी पार पाडली.



.

. रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

. .....स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई.....

.

. दिनांक 21/08/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे उमरेड हद्दीत गस्त घालीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम गीरड बायपास चौक उमरेड येथे रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरुन स्था.गु.शा. चे पथक दि. 21/08/2020 चे 00.15 वा. ते 00.50 वा.सुमारास एमएच– 40/बीजी– 9216 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे क्र. 1) दत्तु अर्जुन भुजाडे वय 39 वर्ष रा. भुयार ता. पवनी जिल्हा भंडारा याला थांबवुन त्याचे वाहनाची तपासणी केली असता त्याने त्याचा मालक नामे आरोपी क्रमांक 2) अमोल जांभुळकर वय 36 वर्ष, रा. उमरेड याचे सांगण्यावरून त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 4 ब्रास रेतीची वाहतुक करतांना मिळून आला. सदर आरोपीच्या ताब्यातुन वाहनासह असा एकुण कि. 20,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

. सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवा. संतोष पंधरे स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उरमेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. 1 ला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवा. मारोती राऊत हे करीत आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक मोनिका राऊत यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस हवालदार पंधरे, मदन आसतकर, पो.शि. राधेश्याम कांबळे, बालाजी साखरे व चालक पो.हवा. भाऊराव खंडाते यांनी यशस्वीरित्या पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर